# **Anvikshnam 2026 in News**

SPM's R A Podar College of Commerce & Economics (Autonomous)'s organized Anvikshnam on 13th & 14th August 2026

Newspaper: Maharashtra Times. Date of publication :18th August 2026

## पोदार कॉलेजात रंगला 'अन्विक्षणम्'



**मुंबई टाइम्स टीम**

संशोधन, नवनवीन उपक्रम, चिकित्सक विचार आणि बौद्धिक देवाणघेवाण यांना प्रोत्साहन देणारा 'अन्विक्षणम् २०२६' हा महोत्सव उत्साहात पार पडला. या वार्षिक संशोधन व विकास महोत्सवाचं आयोजन **आर. ए. पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स (स्वायत्त)** येथे १३ आणि १४ ऑगस्ट रोजी करण्यात आलं होतं. या महोत्सवात विविध शाळा आणि कॉलेजांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. 'महाराष्ट्र टाइम्स' या महोत्सवाचा मीडिया पार्टनर होता.

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

यंदाच्या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना 'अन्विक्षणम् - अनुसंधान : इनोव्हेट, इन्फॉर्मेट, इंटिग्रेट.' म्हणजेच नवनिर्मिती, माहितीकरण आणि एकत्रीकरण अशी होती. नावीन्यपूर्ण कल्पना, माहितीपूर्ण दृष्टिकोन आणि एकत्रित प्रयत्नांच्या माध्यमातून प्रत्यक्ष जगात सकारात्मक बदल घडवणं, हा या संकल्पनेमागील मुख्य उद्देश होता.

महोत्सवातील विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना वर्गातील नियमित शिक्षणापलीकडे जाऊन संशोधनात्मक आव्हानं, चर्चासत्रं आणि कल्पनांची मांडणी करण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा, अभ्यासू वृत्ती आणि जिज्ञासा ठळकपणे दिसून आली. या सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून पोदार कॉलेजच्या माजी प्राचार्य शोभना वासुदेवन उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे संस्थेचा समृद्ध वारसा आणि शैक्षणिक गुणवत्तेबाबतची बांधिलकी अधोरेखित झाली.

कॉलेजच्या प्राचार्य विनिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसंच बौद्धिक विकासासाठी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचं संयोजन शिक्षिका प्रभारी डॉ. वृषाली कानेरी यांच्या देखरेखीखाली करण्यात आलं. जिया पटोले हिनं कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं. अध्यक्ष प्राज्ञा कावडे आणि तिच्या संपूर्ण कोर टीमच्या नियोजनबद्ध मेहनतीमुळे हा महोत्सव यशस्वीरीत्या पार पडला.

संशोधनातून नव्या कल्पनांचा जन्म होतो आणि त्या कल्पनांमधून समाजात सकारात्मक बदल घडवता येतो, हा विचार 'अन्विक्षणम् २०२६'च्या यशस्वी आयोजनातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला.